# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)



**व्यवस्थापन परिषदेच्या १९६ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत**

**मंगळवार, दि. १५ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ०२: ३० वा.**

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९६ वी (तातडीची) **ऑनलाईन बैठक मंगळवार, दि.१५ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ०२:३० वा.** मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली आहे.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | अनुपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल तानाजी लकडे, प्र.कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | **श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी दि.०३/०४/२०२५ रोजी दिलेले पत्र व तसेच दिलेला तडजोडीचा प्रस्ताव विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या तत्कालीन उपकुलसचिव श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांना दि.०५/०४/२०१९ रोजी निलंबीत करण्यात आले होते. तद्नंतर विभागीय चौकशीअंती दि.२१/१२/२०१९ रोजी कार्यालयीन आदेशाद्वारे उपकुलसचिव या पदावरुन बडतर्फ करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुध्द श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी प्रस्तुत विद्यापीठाविरुध्द मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्याकडे अपील क्र. ०२/२०२० दाखल केलेली होती. सदर अपीलामध्ये दि.०५/०९/२०२४ रोजी मे. न्यायाधिकरणाने निकाल देताना सदर अपील मंजुर करून त्यांना उपकुलसचिव या पदावर रुजू करुन घेऊन त्या सवेत रुजू होईर्पयंतचे वेतन व इतर विविध लाभ देण्याबाबत आदेश पारित केलेले आहे.<br>सदर आदेशाविरुध्द मा. व्यवस्थापन परिषदेने गठीत केलेल्या समितीच्या शिफारसीप्रमाणे प्रशासकीय मान्यतेअंती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ३२९२/२०२५ दाखल करुन श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी दाखल केलेल्या अपील क्र. ०२/२०२० मधील आदेशास आव्हान दिलेले आहे. सदर याचिका सद्यस्थितीत प्रलंबीत आहे.<br>सदर याचिका दि.०२/०४/२०२५ रोजी सुनावणीस निघाली असता, सदर याचिका तडजोडीने निकाली काढण्याबाबत श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी मे. उच्च न्यायालयात केलेल्या विनंतीनुसार सदर प्रकरणी तडजोडीची शक्यता तपासण्याकरिता मा. उच्च न्यायालयाने तोंडीसुचना केलेली असल्याबाबत विद्यापीठाच्या वकिलांनी कळविलेले आहे. तसेच सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्ताव योग्य व वाजवी असल्याचे व याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत कळविलेले आहे. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.१६/०४/२०२५ रोजी नेमण्यात आलेली आहे.<br>श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी तडजोडी संबंधी दिलेले पत्र व प्रस्ताव (Consent Terms) चा मसुदा सोबत जोडलेला असून सदर प्रस्तावाद्वारे त्यांनी त्या कार्यरत असलेल्या उपकुलसचिव पदाचे थकित वेतन सोडणार असल्याचे नमूद करुन सेवा सातत्यतासह तद्नुषंगीक लाभ मिळण्याबाबत नमूद करून त्यांचा निलंबन कालावधी रद्द करुन उपकुलसचिव पदावर दि. २१/१२/२०१९ पासून सेवेत रुजू करुन घेण्याबाबत नमूद केलेले आहे. तसेच दि.२१/१२/२०१९ ते सेवेत रुजू होईपर्यंतचे वेतन सोडून देत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे सदर कालावधी हा त्यांच्या | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | सेवासातत्यता, सेवा अनुभव व इतर तद्नुषंगीक लाभ मिळण्यासाठी ग्राह्य धरण्यात येण्याबाबत नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांना निलंबन कालावधी मधील माहे नोव्हेंबर २०१९ व बडतर्फीच्या दिनांका पर्यंतचा Suspension Allowance मिळण्याबाबत व इतर विविध बाबी नमूद करून प्रस्ताव सादर केलेला आहे.<br>श्रीमती साळुंखे यांनी तडजोडीबाबत विद्यापीठास सादर केलेला पत्र व प्रस्ताव (Consent Terms) विचारार्थ. | |
| ठराव: | श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे, प्लॉट नं.६८, वसंत विहार, सोलापूर यांनी दि.०३/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये केलेली विनंती खालील अटींच्या अधिन राहून सर्वानुमते मान्य करण्यात आली.<br>१) श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांना प्रस्तुत Consent Terms नुसार व त्यांनी दाखल केलेल्या अपील क्र.०२/२०२० मधील निर्णयानुसार उपकुलसचिव या पदावर रुजू करुन घेणे.<br>२) श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी Back Wages चे हक्क सोडून सेवेत रुजू होण्याबाबत केलेली विनंती मान्य करण्यात आली.<br>३) श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांची सेवा दि.०५/०४/२०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने विचारात घेण्यात येवून Consent Terms नुसार सेवा सात्तत्यता विचारात घेवून वेतन निश्चितीबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाने मा. विभागीय सहसंचालक, सोलापूर कार्यालयाकडे पाठवावा.<br>४) या व्यतिरिक्त दि.२१/१२/२०१९ रोजी सेवेतून बडतर्फ झाल्यापासून ते सेवेत रुजू होणाच्या तारखेपर्यंत Back Wages चे हक्क सोडून दिल्यामुळे त्यांना याबाबतचे आर्थिक लाभ पूर्वलक्षी प्रभावाने मिळणार नाहीत व भविष्यात त्याबाबत त्यांनी मागणी व तक्रार उपस्थित करु नये.<br>५) श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी रुजू होताना याबाबतचे हमीपत्र सादर करावे.<br>६) श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांना निलंबन कालावधीतील भत्ता दिला गेला नसल्यास याबाबत पडताळणी करुन निलंबन कालावधीतील देय भत्ता शासन मान्यतेच्या अधिन राहून अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.<br>७) वरीलप्रमाणे कार्यवाही श्रीमती अर्चना सुनिल साळुंखे यांनी मान्य केल्यास याबाबत त्यांच्या विरुध्द प्रलंबित याचिका क्र. WP No.३२९२/२०२५ ही याचिका Consent Terms व ठरावानुसार निकाली काढण्यास विद्यापीठ तयार असल्याबाबतची बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याबाबत विद्यापीठ नियुक्त वकीलांना कळविण्यात यावे. | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद